रविवार, २१ सप्टेंबर २०१४ प्रहार

# दोडामार्ग महाविद्यालयाकडून माळीण आपदग्रस्तांना मदत

## पंधरा हजारांचा धनादेश तहसिलदारांकडे सुपूर्द



तहसिलदारांकडे माळीण आपदग्रस्तांना मदत देताना महाविद्यालयाचे प्राचार्य सोबत विद्यार्थी

▶ दोडामार्ग *(प्रतिनिधी)*

नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरी संचलित दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयतील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने माळीण आपदग्रस्तांसाठी जमा करण्यात आलेला पंधरा हजार रूपयांचा निधी धनादेशाच्या स्वरूपात दोडामार्ग तहसिलदार संतोष जाधव यांच्याकडे देण्यात आला.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने १४ सप्टेंबरला पुणे जिल्ह्यातील माळीण गावच्या आपदग्रस्तांसाठी दोडामार्ग बाजारपेठेत मदत फेरीचे आयोजन केले होते. यातील जमा रक्कम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात आले. यावेळी प्राध्यापक वर्गासह अनिल गावडे, ममता गायचोर व भुषण सावंत हे विद्यार्थी उपस्थित होते.